# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

**ग्राहक तक्रार क्र. ७३/२०११** **दि.१०.०२.२०११**

| | |
|---|---|
| **श्री.भालचंद्र विठ्ठल सरदेसाई.<br>७२२, शिवाजी नगर सडा,<br>पॉवरहाऊस जवळ, रत्नागिरी.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग रत्नागिरी .** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप , कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **श्री.भालचंद्र विठ्ठल सरदेसाई.** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **श्री.सुरेश य.जोगी, सहाय्यक अभियंता<br>उपविभाग लांजा** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री भालचंद्र विठ्ठल सरदेसाई,७२२, शिवाजी नगर सडा, पॉवर हाऊसजवळ, रत्नागिरी यांचा मौजे वेरवली(बुद्रुक) ता.लांजा येथिल गट क्रमांक ५३४ हया जमिनीमध्ये ३ HP कृषीपंप जोडणी अद्याप न दिल्याबद्दलची तक्रार दि.१०.०२.२०११ रोजी आवश्यक त्या तपशिलासह दाखल झालेली आहे. वीज जोडणीसाठी अर्ज केल्यानंतर, एक वर्षाहून अधिक काळ विलंब झालेला असल्यामुळे तक्रार मंचाकडे दाखल झालेली असून ती नियमानुसार आहे. सदर प्रकरणाची सुनावणी दि.२९.०३.२०११ रोजी घेण्यात आली असता उभयबाजुनी उपस्थित राहून आपला युक्तीवाद केला व आवश्यक तो तपशिल देखिल सादर करण्यात आला.

तक्रार प्रकरणाच्या सुनावणीत ग्राहकाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की मौजे वेरवली बुद्रुक, ता.लांजा येथिल भु-मापन क्र.५३४ ही शेतजमीन तक्रारदार अर्जदाराने एप्रील २००४ मध्ये श्री.पारिख यांचेकडून विकत घेतली त्यानंतर सदर जमीनीमंध्ये शेती पंपासाठी ३HP चे वीजपंप कनेक्शन मिळणेसाठी दि.१६.०८.२००५ रोजी अर्ज केला. अर्जानुसार सर्व्हे करुन दि.०७.११.२००५ रोजी कोटेशन देण्यात आले. सदर कोटेशन प्राप्त होताच त्याच दिवशी कोटेशन मंध्ये नमुद केलेली रक्कम रु.४३३५/- भरणा केली. त्यानंतर कंपनीच्या नियमानुसार सर्व अटींची पुर्तता करुन देखिल माझे शेती पंपाचे कनेक्शन देण्यात आले नाही. त्यानंतर दि.०३.०४.२००६ रोजी सहाय्यक अभियंता , लांजा यांनी एक पत्र पाठवून कळविले की, सदर शेत जमीनमंध्ये यापुर्वी श्री.भास्कर एच्.हर्डीकर यांचे नावे एक शेती पंप होता व सदर पंपाची थकबाकी रु.२२५७/- इतकी प्रलंबित असून सदर थकबाकीची भरणा केल्यानंतर तक्रारदार अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे नविन वीज जोडणी देणेत येईल. वास्तविक ही जमीन श्री.हर्डीकर यांचकडून खरेदी केलेली नसून ती पारिख यांचेकडून खरेदी केलेली आहे. तसेच अर्ज केल्यानंतर ज्यावेळी महावितरणचे कर्मचारी सर्व्हे करण्यासाठी आलेले होते त्यावेळी तेथे जुनी वीज वाहीनी अस्तित्वात होती व त्यामुळेच माझ्या कनेक्शनची मंजूरी फक्त सर्व्हिस कनेक्शन अशा स्वरुपाची केलेली आहे. असे असताना या जमीनीमंध्ये एक जुने कनेक्शन होते व त्यावर थकबाकी आहे याची पुसटशी शंका देखील न घेता माझे कनेक्शन मंजूर केले व कोटेशन प्रमाणे पैसे भरल्यानंतर सुमारे पाच महीन्यानंतर महावितरणला त्या ठिकाणी पुर्वीची थकबाकी असल्याचा शोध लागला.

नमुद केलेली थकबाकी श्री. भास्कर हर्डीकर यांच्या नावाच्या शेती पंपाची आहे पण सदर जमीन श्री.पारिख यांचे कडून खरेदी केलेली असल्यामुळे या थकबाकीसाठी मला जबाबदार धरता येणार नाही. तसेच ज्यावेळी जमीनीचा व्यवहार झाला त्यावेळी कायदयानुसार सर्व सोपस्कर पुर्ण केलेले असून खरेदी व्यवहार पुर्ण करण्या अगोदर या व्यवहाराबाबतचे निवेदन दि.११.०३.२००४ च्या दै.तरुण भारत मध्ये दिलेले होते. पण या निवेदनाची दखल देखिल महावितरणकडून घेण्यात आली नाही व सुमारे तीन वर्षानंतर म्हणजे दि.२०.०३.२००७ रोजी सहाय्यक अभियंता, लांजा यांनी सदर नोटीसीमध्ये हर्डीकर यांच्या नावाचा उल्लेख नाही. त्यामुळे ही नोटीस वीज कंपनीस बंधनकारक नाही असे म्हणत असेल तर मी देखिल जमीन श्री. पारेख यांचे कडून विकत घेतलेली असून श्री.हर्डीकर यांचे पंपाचे थकबाकी बाबत मी कसा काय जबाबदार होऊ शकतो.

तसेच थकबाकीला कालावधी २००४ साला पुर्वीचा आहे. व माझा अर्ज ऑगस्ट २००५ मध्ये दाखल केल्यानंतर व नोव्हेंबर २००५ मध्ये पैसे भरेपर्यन्त महावितरण शांत होते व नेमका कनेक्शन देण्याच्या वेळेस थकबाकीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. वास्तविक या थकबाकीच्या वसुलीसाठी जुन्या ग्राहकावर कायदेशिर कार्यवाही करुन थकबाकी वसुल करता आली असती पण अशी कोणतीही कायदेशिर कार्यवाही न करता अडवणूकीचे धोरण ठेऊन माझे कनेक्शन देण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे.

प्रस्तूत थकबाकी श्री.हर्डीकर यांचे नावे असून ती २००४ पुर्वीची आहे. मी या प्रकरणातील जमीन श्री. पारिख यांचे कडून खरेदी केली असून श्री.हर्डीकर यांच्या थकबाकीबाबत माझा कोणताही दुरान्वये देखिल संबंध येत नाही. सदर

खरेदी बाबत मी वृत्तपत्रामंध्ये निवेदन दिलेले होते. सबब सर्व कायदेशिर सोपस्कार मी पुर्ण करुन जमीनीचा व्यवहार केलेला आहे त्यामुळे श्री.हर्डीकर यांच्या थकबाकीबाबत मी कोणत्याही प्रकारे जबाबदार होऊ शकत नाही. सबब मंचाकडून माझे कनेक्शन ताबडतोब देण्याबाबत महावितरणलाआदेश द्यावेत.

महावितरणच्या वतीने सदर प्रकरणाबाबत लेखी स्पष्टीकरण दाखल करण्यात आले होते. तसेच सुनावणीच्या वेळेस श्री. सुरेश जोगी, सहाय्यक अभियंता, उपविभाग लांजा यांनी महावितरणच्या वतीने युक्तीवाद केला. आपल्या युक्तीवादात श्री.जोगी यांनी स्पष्ट केले की, श्री.सरदेसाई यांनी दि.१६.०८.२००५ रोजी ३HP च्या शेती वीजपंपाच्या कनेक्शनसाठी अर्ज केला होता. त्यानंतर रितसर सर्व्हे करुन अंदाजपत्रक मंजूर करुन घेऊन दि.०७.११.२००५ रोजी कोटेशन देण्यात आले. त्यानुसार अर्जदारानी पण त्याच दिवशी कनेक्शन पोटी भरावयाच्या रकमेचा भरणा केलेला आहे. पण त्यानंतर सदर शेतजमीनीमंध्ये यापुर्वी श्री.भास्कर हर्डीकर यांचे नावे एक ३HP शेतीपंपाचे कनेक्शन होते व त्यावर असलेल्या रु.२२५७/- इतक्या थकबाकीसाठी हे कनेक्शन कायम स्वरुपी बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हया जमीनीमंध्ये असलेल्या जुन्या वीज पंपाच्या कनेक्शनची थकबाकी रु.२२५७/- भरणेबाबत श्री.भालचंद्र विठ्ठल सरदेसाई यांना दि.०३.०४.२००६ रोजी कळविण्यात आले. पण त्यांनी आजपर्यन्त ही थकबाकी भरलेली नसल्यामुळे त्यांच्या अर्जाप्रमाणे नविन कनेक्शन देण्यात आलेले नाही.

महावितरणचे परिपत्रक क्र.३८१, दि.२२.०९.२००३ प्रमाणे कोणत्याही कनेक्शनचे नाव बदली करणे अथवा नविन कनेक्शन देण्यापुर्वी त्या जागी असलेल्या जुन्या कनेक्शनची जर काही थकबाकी असेल तर ती नविन ग्राहकानी पुर्णपणे भरल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी अशा सुचना आहेत त्यामुळे ही थकबाकी भरल्यानंतरच नविन कनेक्शन देता येईल.

प्रस्तूत थकबाकी ही सन २००० ते २००४ या कालावधीची आहे. या कालावधीत श्री.पारिख यांनी पण हया कनेक्शनचा वापर केलेला आहे. तसेच ही थकबाकी वसुल करण्यासाठी कंपनीकडून रितसर नोटीस देऊन वीज पुरवठा खंडीत केलेला आहे. त्यामुळे महावितरणला या थकबाकीवर असलेला हक्क सोडता येणार नाही. तसेच श्री.सरदेसाई यांनी दै.तरुण भारत मंध्ये दि.११.०३.२००४ दिलेल्या निवेदनामंध्ये श्री.पारिख यांचे नाव असून जुनी थकबाकी श्री.हर्डीकर यांचे नावे आहे. त्यामुळे त्यानी दिलेले वृत्तपत्र निवेदनास महावितरण बंधनकारक राहू शकत नाही. सबब ही थकबाकी भरणा झालेनंतर श्री.सरदेसाई यांचे वीजेचे कनेक्शन देता येईल तसेच सद्य परिस्थितीत तेथे असलेले पोल पण काढून टाकणेत आलेले असल्यामुळे कनेक्शन देण्यापुर्वी परत पाच नवीन पोल टाकून वाहीनी तयार करावी लागेल व त्यानंतरच हे कनेक्शन देता येईल.

तक्रार प्रकरणात दाखल करण्यात आलेली कागदपत्रे, उभय पक्षानी केलेला युक्तीवाद व प्रकरणाची शहानिशा करता शेती पंपाच्या वीजजोडणीस विलंब झालेला आहे असे मंचाचे स्पष्ट मत आहे.

प्रस्तूत प्रकरणात ग्राहकानी रितसर अर्ज करुन व त्यासाठी आवश्यक शुल्काचा भरणा करे पर्यन्त महावितरणला त्या ठिकाणी पुर्वीची थकबाकी असल्याची बाब लक्षात आलेली नाही. वास्तविक महावितरणकडून सर्व्हे करण्यासाठी कर्मचारी गेले असता तेथे पुर्वीची एक वाहीनी अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले व त्यामुळेच हे कनेक्शन फक्त सर्व्हिस कनेक्शन अशा स्वरुपातचे मंजूर करण्यात आलेले आहे. जर त्याच वेळी हया अनुशंगाने तपासणी केली असती तर थकबाकी बाबतची माहीती मिळू शकली असती पण असे न करता अंदाजपत्रक मंजूर करुन ग्राहकानी पैसे भरल्यानंतर जुन्या थकबाकी बाबतचा मुद्दा उपस्थित करुन महावितरण सदर कनेक्शन देणे टाळू शकत नाही.

वीज विधेयक २००३ मधील कलम ५६ नुसार महावितणला थकबाकी वसुली करण्यासाठी अधिकार व त्यास अनुसरुन अवलंबनाच्या पध्दती विषद केल्या आहेत. प्रस्तूत प्रकरणातील थकबाकी ही सन २००० ते २००४ या कालावधीची असताना देखिल महावितरणने थकबाकी वसुली करण्यासाठी कोणत्याही कायदेशिर पध्दतीचा अवलंब

केलेला नाही व फक्त एक नोटीस देऊन थकबाकी वसुलीची प्रक्रिया आजतगायत प्रलंबित ठेवलेली आहे. तसेच ही थकबाकी श्री.भास्कर हर्डीकर यांच्या नावावर असून प्रस्तूत प्रकरणातील जमीन श्री.सरदेसाई यांनी श्री.पारिख यांचेकडून खरेदी केलेली आहे. तसेच खरेदीची प्रक्रिया पुर्णपणे कायदेशीर बाबींचा अवलंब करुन केलेली आहे व त्याचाच एक भाग म्हणून या खरेदी व्यवहाराची नोटीस वृत्तपत्रामंध्ये देखील दिलेली आहे. सबब श्री. भास्कर हर्डीकर यांचे नावे असलेल्या थकबाकीबाबत श्री.सरदेसाई कोणत्याही प्रकारे जबाबदार होऊ शकत नाही.त्यामुळे श्री.हर्डीकर यांच्या नावाची थकबाकीची सबब पुढे करुन महावितरण श्री.सरदेसाई यांचे कनेक्शन देण्याचे टाळू शकत नाही असे मंचाचे स्पष्ट मत आहे. तसेच वीज विधेयक २००३ मधील कलम ५६ मधील तरतुदीस अधिन राहून महावितरणला श्री.हर्डीकर यांचे नावे असलेली थकबाकी कायदेशीर दावा दाखल करुन वसुल करता येऊ शकेल.

तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता कोटेशन प्राप्त होताच, कोटेशनच्या रकमेचा भरणा दि.०७.१.२००५ रोजीच करण्यात आलेला आहे. महावितरणकडून अशतः कार्यवाही झाली असली तरी सुद्धा पुरवठा दाराचे कर्तव्य आणि अनुषंगिक बाबी विहीत कालावधीत पुर्ण झालेल्या नाहीत. वीज जोडणी देताना किंबहुना अर्ज आल्यापासूनची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली असतानासुद्धा महावितरणने आपल्या कार्यपद्धतीनुसार वीज विधेयकातील तरतुदींचा तसेच नियामक आयोगाच्या नियमावलीचाही भंग केल्याचे स्पष्ट पणे दिसून आले आहे. कृतीमानकाची जबाबदारी महावितरणवर असताना ती करण्यात आलेली नाही. सबब कृतीमानकाच्या अपयशाबद्दल भरपाई देणे महावितरणवर बंधनकारक आहे. ग्राहकाने अर्ज प्रकरणाबाबत कोणत्याही त्रुटी ठेवलेल्या नाहीत किंबहुना सातत्याने पाठपुरावाही केलेला आहे. महावितरणने कृतीमानकाच्या अपयशाबद्दल दिलेले स्पष्टीकरण पुर्णतः समर्थनीय नाही. तथापी कालावधीचा विचार करता आणि महावितरणने केलेले उल्लंघन विचारात घेता ग्राहक भरपाईस पात्र आहे. तथापी एकूण विलंबाबद्दल होणारी भरपाई विचारात घेता अपवादात्मक परिस्थितीच्या अनुषंगाने रु.५०००/- ग्राहकाला भरपाईपोटी मिळणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त ग्राहकाचा अनुषंगिक खर्चही विचारात घेतला असून अश्या खर्चाबद्दल रु.५००/- देण्यात यावे असेही मंचाचे स्पष्ट मत आहे. भरपाईपोटी देण्यात येणारी रक्कम विहीत कालावधीत महावितरणने द्यावी.

मंचाच्या वरील निष्कर्षावरुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१. अर्जदाराची तक्रार मान्य करण्यात आली असून, अर्जदाराने मागणी केल्या प्रमाणे ३HP कृषीपंप वीज कनेक्शन हा आदेश मिळाल्यापासून ४० दिवसाचे आत देण्यात यावे.**

**२. नियामक आयोगाच्या नियमावलीनुसार, अर्जदार कृतीमानकांच्या अपयशाबद्दल नुकसान भरपाई मिळणेस पात्र असल्याने भरपाई पोटी रु.५०००/- ( रु.पाच हजार मात्र ) व खर्च व अनुशंगीक बाबीसाठी रु.५०० /-( रु.पाचशे मात्र) हा आदेश मिळाले पासून १५ दिवसाचे आत देण्यात यावेत.**

**३. विहीत कालावधीत आदेशाची अंमलबजावणी करुन पुर्तता अहवाल मंचाकडे सादर करावा.**

४. या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग
६०६/६०८, केशवा बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस्. जामखेडकर | श्री. व्हि.बी.जगताप | श्री.एन्.ए.कुलकर्णी |
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- १८.०४.२०११
ठिकाण :- रत्नागिरी.